- Cheval C., Aldon D., Galaud J. P., Ranty B. (2013). Calcium/calmodulin-mediated regulation of plant immunity. Biochim. Biophys. Acta 1833 1766–1771.

Contributed by Dr. Y. G. Prasad, Director, CICR, Nagpur and J. Annie Sheeba, Senior Scientist, Plant Physiology, CICR, RS, Coimbatore

Cotton scenario during June 2021

Isabella Agarwal and A.R. Reddy
Principal Scientists, Agricultural Economics

The latest USDA report featured meaningful changes in 2021-22 cotton production (-1.5 million bales to 116.9 million) and mill-use (-1.3 million bales to 121.7 million) with only slight revisions to 2022-23 forecasts (world production +205,000 bales to 121.3 million, mill-use -450,000 bales to 121.5 million). The largest country-level changes for 2021-22 production were for India (-1.0 million to 24.5 million) and Brazil (-500,000 to 12.7 million). For 2022-23, the biggest increase was for Egypt (+100,000 bales to 420,000). In terms of mill-use, the largest changes for 2021-22 were for China (-500,000 bales to 38.0 million), India (-500,000 to 25.5 million), Mexico (-100,000 to 1.9 million), and Vietnam (-100,000 to 7.3 million).



For the global 2022-23 cotton balance sheet, ending stocks were higher than projected in June, despite a 1.2 million bale cut to expected production. Beginning stocks are higher, as 2021-22 consumption is cut by nearly 2.0 million bales and projected consumption in 2022-23 is also reduced by 1.6 million. China, India, Bangladesh, Vietnam and Brazil are the only countries besides United States to have its 2022-23 production reduced. Global cotton markets were in downward trend.

India's exports of cotton yarn, fabrics, made-ups, handloom products and carpet declined in June 2022, which dragged down the overall textile exports by 14.30 per cent. According to industry experts, export of cotton yarn and fabrics fell due to disparity in prices, while export of other textile products dropped due to slower demand amid economic volatility. As per the government sowing data till end of June, the acreage was around 31.83 lakh hectares versus 37.84 lakh hectares during the last year's corresponding period.

Cotton in Media

Sakal Agrowon 7/6/2022

कापूस उत्पादकांनो, पहिल्या टप्प्यात पाऊस कमी झाला तरी 'नो टेन्शन'

दुष्काळ सहनशील पीक : कपाशीला ६०० ते ७५० मिमी पावसाचीच गरज

लोकमत विशेष

सुनील चरपे

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : यंदा मान्सून रेंगाळला असून, पहिल्या टप्प्यात कॉटन बेल्ट असलेल्या पूर्व विदर्भासह जळगाव जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस बरसणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने व्यक्त केला आहे. कापूस हे दुष्काळ सहनशील पीक असून, या पिकाला सरासरी ६०० ते ७५० मिमी पावसाची गरज असल्याने पहिल्या टप्प्यात पाऊस सरासरीपेक्षा कमी कोसळला तरी कापूस उत्पादकांनी चिंता करू नये, अशी माहिती कृषी व पर्जन्यमान अभ्यासकांनी दिली.

कपाशीचे पीक दुष्काळ सहनशील असून, भारी व काळीच्या जमिनीत ते किमान १५ ते २० दिवस आणि हलक्या जमिनीत आठवडाभर पावसाचा खंड व पाण्याचा ताण सहन करू शकते. सुरुवातीच्या काळात पर्जन्यमान सरासरीपेक्षा १९ टक्के कमी अथवा १९ टक्के अधिक राहिल्यास दोन्ही प्रकारच्या जमिनीमध्ये कपाशीचे पीक चांगले येते. परंतु, या काळात तापमान किमान १५ डिग्री सेल्सिअसच्या आसपास असणे आवश्यक आहे.

पावसाचे प्रमाण यापेक्षा कमी अथवा अधिक झाल्यास पिकाचे नुकसान होण्याची शक्यता असते.

अधिक पाऊस झाल्यास जमिनीत पाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने यवतमाळ, अमरावती, अकोला, नागपूर व जळगाव जिल्ह्यातील कपाशीसाठी धोक्याची सूचना ठरू शकते. वर्धा जिल्ह्यातील माती वाळूयुक्त असल्याने हा जिल्हा अपवाद ठरतो, असेही यवतमाळ येथील कापूस उत्पादक शेतकरी मिलिंद दामले यांनी सांगितले.

मातीची सच्छिद्रता महत्त्वाची

पिकांची उत्तम वाढ आणि चांगल्या उत्पादनासाठी मातीची सच्छिद्रता महत्त्वाची आहे. यासाठी मातीच्या छिद्रांमध्ये ५० टक्के पाणी व ५० टक्के हवा असायला पाहिजे. पिकांची मुळे या छिद्रांमधून हवेतील ऑक्सिजन शोषून घेत असून, कॉर्बन डायऑक्साईड हवेत सोडतात. त्यामुळे जमिनीत कार्बोलिक ॲसिड तयार होऊन जमिनीतील जैविक प्रक्रिया वाढते व मुळे पोषक अन्नद्रव्ये शोषून घेतात. पाऊस अधिक झाल्यास ही छिद्रे पाण्यामुळे बुजतात व पिकांना हवेतून मिळणाऱ्या ऑक्सिजनचे प्रमाण कमी होत असल्याने पुढील सर्व प्रक्रिया मंदावते. शिवाय, जमिनीत बुरशी तयार होते. त्याचा पिकांच्या वाढीसोबतच उत्पादनावर विपरीत परिणाम होतो.

शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये. पेरणीयोग्य ८० ते १०० मिमी पाऊस झाल्यास तसेच जमिनीत पुरेसा ओलावा असल्याची खात्री करून पेरणी करावी. पाण्याच्या योग्य निचऱ्यासाठी रुंद सरी वरंबा पद्धतीचा अवलंब करावा. जलसंधारणासाठी मुख्य मशागतीची कामे उताराला आडवी अथवा कंटूर रेषेला करावी.

- डॉ. सचिन वानखेडे, विषय विशेषज्ञ, हवामान शास्त्र, कृषी विज्ञान केंद्र, केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर.

वर्ष	तपशील	औरंगाबाद	अमरावती	नागपूर
२०१७	सरासरी पर्जन्यमान	८००.८	८५३.६	,१९९
	वास्तविक पर्जन्यमान	६७७.२	५६४.१	८०६
	रुईची उत्पादकता (कि./हे.)	१२८	२१३	३१७
२०१८	सरासरी पर्जन्यमान	८००.८	८५३.६	१,१९९
	वास्तविक पर्जन्यमान	५३३.२	६६८.३	१,०३८
	रुईची उत्पादकता (कि./हे.)	१३६.७	३६६.७९	४१०.[illegible]
२०१९	सरासरी पर्जन्यमान	८००.८	८५३.६	१,१९९
	वास्तविक पर्जन्यमान	८४५.४	८४०.५	१,२६३
	रुईची उत्पादकता (कि./हे.)	२५९.९९	२४०.४६	४४८.[illegible]
२०२०	सरासरी पर्जन्यमान	८००.८	८५३.६	१,१९९
	वास्तविक पर्जन्यमान	९५१.१	८७०.२	१,१५८
	रुईची उत्पादकता (कि./हे.)	३६०	३५९	४५२
२०२१	सरासरी पर्जन्यमान	८००.८	८५३.६	१,१९९
	वास्तविक पर्जन्यमान	१,१९९	१,०६२.६	१,२८३
	रुईची उत्पादकता (कि./हे.)	२२८	३३४	४७६

Lokmat Times

NEWS IN BRIEF

ICAR-CICR and KVK Nagpur hold seed distribution programme

Members of ICAR-CICR and Krishi Vigyan Kendra, Nagpur along the farmers.

ICAR-CICR and Krishi Vigyan Kendra, Nagpur organised a seed distribution programme for FLDs on 57 acres of farmers' fields under the Scheduled Caste Sub Plan (SCSP) in five villages of Nagpur district on June 14.

A total of 57 SC farmers selected as beneficiaries for FLDs were provided seeds of the soybean (var. JS 20-69) and tur (PKV-Tara) 30 kg and 2 kg per farmer respectively. The farmers were also sensitized about the improved package of practices to be followed for growing the soybean and tur crops.

Dr SV Sarode, former director of research, Dr PDKV, Akola was the chief guest on the occasion. Dr YG Prasad, director, ICAR-CICR, Nagpur chaired the programme. Dr Nandini Gokte-Narkhedkar, I/C head division of crop protection, Dr SN Rokade, head, KVK, Dr JH Meshram, nodal officer SCSP shared the dais with dignitaries.

Nagpur First
Page No. 3 Jun 20, 2022
Powered by: erelego.com

नागपूर, शुक्रवार, ३ जून २०२२

सकाळ अॅग्रोवन

'शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी प्रयत्न'

नागपूर : ''शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. येत्या काळात विविध उपाययोजनांवर भर दिला जाणार आहे,'' अशी माहिती केंद्रीय कृषी मंत्रालयातील सहसचिव डॉ. एन. विजयालक्ष्मी यांनी दिली.

केंद्रिय कापूस संशोधन संस्थेच्या वतीने आयोजित गरीब कल्याण संमेलनाच्या थेट प्रक्षेपण कार्यक्रमात त्या बोलत होत्या. संस्थेचे संचालक डॉ. वाय. जी. प्रसाद, केंद्रीय मृदा सर्वेक्षण व भूमी उपयोग योजनेचे संचालक डॉ. बी. एस. व्दिवेदी, कापूस अभियांत्रिकी संस्थेचे संचालक डॉ. एस. के. शुक्ला, खापरीचे माजी सरपंच केशव सोनटक्के, हुडकेश्वर सरपंच मीना शेंडे, केव्हीके तज्ज्ञ डॉ. एस. एस. पाटील यांची या वेळी उपस्थिती होती. डॉ. विजयालक्ष्मी यांनी केंद्रस्तरावर शेतकऱ्यांसाठी प्रस्तावीत उपक्रम व योजनांची माहिती दिली. त्यासोबतच हवामान बदलानुरूप बियाणे व पूरक तंत्रज्ञानावर संशोधनाचे कार्य भारतीय कृषी संशोधन परिषदेने हाती घेतल्याचे सांगितले. येत्या काळात हवामान बदलामुळे पारंपरिक शेती पद्धतीत बदलाची गरज भासणार आहे. त्यानुरूप संशोधनाची दिशा आयसीएआरने निश्चित केली आहे. त्याचे सकारात्मक परिणाम येत्या काळात अनुभवता येतील, असा विश्वासही विजयालक्ष्मी यांनी व्यक्त केला. डॉ. वाय.जी. प्रसाद यांनी देखील या वेळी आपली भूमिका मांडली.

Navbharat 2/6/2022

गरीब कल्याण सम्मेलन आयोजित

नागपुर, व्यापार संवाददाता. कृषि विज्ञान केन्द्र एवं केन्द्रीय कपास अनुसंधान संस्थान के सहयोग से वर्धा रोड स्थित संस्थान के प्रांगण में किसानों के कल्याण के लिए राष्ट्रीय स्तर पर आयोजित सम्मेलन में प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने सीधे शिमला से लाभार्थियों को संबोधित किया. पूरे देश में 1,500 स्थानों से इस कार्यक्रम का सीधा प्रसारण हुआ. इसमें शहर का केंद्रीय कपास अनुसंधान संस्थान और कृषि विज्ञान केंद्र शामिल रहा. लाभार्थी किसान उमरेड, भिवापुर, कलमेश्वर, पारशिवानी, कुही आदि गांवों से लाइव कार्यक्रम के लिए उपस्थित रहे. इस लाइव प्रसारण में प्रधानमंत्री ने पीएम आवास योजना, प्रधानमंत्री किसान सम्मान निधि, उज्ज्वला योजना, पोषण अभियान, मातृ वंदना योजना, स्वच्छ भारत मिशन, जल जीवन मिशन और अमृत, प्रधानमंत्री स्वनिधि योजना, एक राष्ट्र एक राशन कार्ड, प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना सहित अन्य के बारे में लाभार्थियों के साथ चर्चा की. यह संवाद न केवल इन योजनाओं के जन-केंद्रित दृष्टिकोण को रेखांकित करेगा, बल्कि यह नागरिकों के जीवन को और अधिक आरामदायक बना देगा. कार्यक्रम की अध्यक्षता डॉ. विजयलक्ष्मी ने की. कार्यक्रम में भा.कृ.अनु.प. निदेशक डॉ. वाई जी प्रसाद, डॉ. बी एस द्विवेदी, डॉ. एस. के. शुक्ला केशव सोनटक्के, मीना शेंडे, डॉ. एस एस पाटिल सहित अन्य अधिकारी उपस्थित थे. संस्थान ने जिले के 500 किसानों को फसल सुरक्षा किट वितरित की.

तरुण भारत

Apla Nagpur | 2022-06-03 | Page- 2
epaper.tarunbharat.net

नागरिकांचे जीवन सुसह्य व्हावे हेच ध्येय

पंतप्रधानांच्या संवादाने नागपूर जिल्ह्यातील शेतकरी सुखावले

◆ नागपूर, २ जून

भारतात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे जीवन सुसह्य व्हावे, विशेषत: लोकांच्या पोटाची खळगी भरणाऱ्या शेतकऱ्यांना सुख मिळावे याकरिता आम्ही सदैव तत्पर आहोत. अगदी तीच भूमिका घेत आज आपण शेतकऱ्यांशी संवाद साधला. हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे वाक्य ऐकून नागपूर जिल्ह्यातील सुमारे १५०० शेतकरी सुखावले. प्रसंग होता केंद्रीय कापूस संशोधन केंद्र नागपूर येथे गरीब कल्याण योजनेच्या अंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाचे थेट प्रक्षेपण उपस्थित शेतकऱ्यांना दाखविण्यात आले.

कृषी विज्ञान केंद्र व केंद्रीय कापूस संशोधन केंद्र यांच्या वतीने गरीब कल्याण संमेलन शत प्रतिशत सशक्तीकरण हा शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय स्तरावरचा सोहळा आयोजित केला होता. यावेळी शिमला येथून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जिल्ह्यातील १५०० शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी केंद्रीय कृषी विभागाच्या सह सचिव डॉ. एन.विजयालक्ष्मी, केंद्राचे संचालक डॉ. वाय.जी.प्रसाद, डॉ. व्ही. संथी, डॉ. बी.एस. द्विवेदी, डॉ. एस.के. शुक्ला, केशव सोनटक्के, मीना शेंडे, डॉ. एस.एस.पाटील उपस्थित होते.

यावेळी भिवापूर, उमरेड, कळमेश्वर, पारशिवनी, कुही येथील शेतकरी बहुसंख्येने सहभागी झाले होते. पंतप्रधानांनी ग्रामीण भागात सुरू असलेल्या विविध योजनांचा आढावा घेतला. जल जीवन मिशन, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, एक राष्ट्र एक रेशन कार्ड, प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना, आयुष्मान भारत योजना, आवास योजना, प्रधानमंत्री मृदा योजना त्यांनी सांगितल्या आणि पातील लाभार्थ्यांशी संवाद साधला. लाभार्थ्यांना नेमक्या कुठल्या अडचणी आल्या याचा अभ्यास करून तातडीने पुढील लोकांना त्रास होणार नाही याची काळजी घेतली जाणार असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले. एका साध्या शेतकऱ्याने केलेली सूचना सर्वोच्च पदी विराजमान पंतप्रधान नरेंद्री मोदी ऐकून त्यावर अंमल करतात हा त्यांच्यातील मोठेपणा नक्कीच आपल्या देशाला एकविसाव्या शतकात महासत्ता बनविणार असल्याचा विश्वास उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रम यशस्वी व्हावा म्हणून डॉ. सुभाष पाटील, डॉ. यु.जी.गळकाटे, अक्षय कांबळे यांनी अथक परिश्रम घेतले.

(तभा वृत्तसेवा)

शेतकरी संमेलनात बबिता मून यांचा सत्कार करताना सहसचिव डॉ. एन. विजयालक्ष्मी, संचालक डॉ. वाय. जी. प्रसाद, तर उपस्थित डॉ. व्ही. संथी, डॉ. बी. एस. द्विवेदी, डॉ. एस. के. शुक्ला, केशव सोनटक्के, मीना शेंडे, डॉ. एस. एस. पाटील.

Powered by iDocuments

Farmers rejoice at windfall earnings after record cotton yield & never-before prices

Sarfaraz.Ahmed
@timesgroup.com

Farmers from Umred, Bhiwapur, Kalmeshwar, Parseoni and Kuhi had gathered at the CICR on Tuesday

Nagpur: Call it sheer luck or proper training, or combination of both, better yield coupled with never-before rates for cotton have brought windfall gains to farmers in Vidarbha, infamous for agrarian crisis.

Avinash Meshram, a small farmer from Kalmeshwar in Nagpur district, has had an unusually successful year. Meshram harvested a whopping 12 quintals cotton from his one acre land in Sonapur village in the district. The season's earnings — ₹10,000 per quintal — left him with good profit after recovering the investment.

Similarly, **Vinod Gedam**'s gamble of sowing cotton in 20 acres at Amboli village of Umred tehsil yielded him over ₹12 lakh profit this year. Gedam had started farming in 2011 after he quit working as a store helper in Nagpur and returned to his native village.

High demand and less production saw cotton prices soaring to more than double of the MSP of ₹6,050 this year.

Many farmers from the region, including Meshram and Gedam, feel government schemes and financial assistance of ₹6,000 helped them increase their profits. Both were speaking to **TOI** on the sidelines of a programme organized by Central Institute of Cotton Research (CICR) on Wardha Road to webcast PM Narendra Modi's 'Garib Kalyan Sammelan' address from Shimla.

Farmers from Umred, Bhiwapur, Kalmeshwar, Parseoni and Kuhi had gathered at the CICR on Tuesday.

"This is the first time I am reaping huge benefits. I had availed farm loan of Rs1.15 lakh in 2011. I never got a loan waiver. I have applied again and hope this time my application is accepted. This will leave me with good money in hand to further invest in farming," said Gedam.

▶Eased fin burden, P 3

'Soaring prices eased burden on farmers'

▶Continued from P 1

While scientists at the ICAR-CICR cited different reasons for cotton prices fetching record prices, farmers believe it is due to the training and timely assistance from the government which helped them optimally utilize the resources.

WHITE GOLD

Babita Moon (47) from Wardha district said she received pheromone traps, cotton bags, spraying kits, seeds, fertiliser DAP and urea free of cost under scheduled caste sub plan (SCSP). "I could counter the bollworm attack because of these resources and training. I hold 3 acre land. It gave me 10 quintals cotton yield despite the pest attack. I fetched Rs8,000 per quintal," she said.

Crop management techniques and know-how of pesticide usage helped Jyoti Moon get 26 quintals cotton from 4 acres. "I got Rs10,000 per quintal rate," said the resident of Devalali village in Wardha.

Some like **Meenakshi Sahare** (42) missed out on the rare opportunity. "I opted for chana (gram) on my 5 acre farm. Now, I shall be sowing cotton," she said.

Subhash Patil, subject matter specialist, CICR, agreed there is now a strong possibility of increase in cotton acreage. "Soaring prices have eased the financial burden on farmers. They are likely to replace soyabean with cotton on 10% to 20% area. Next season, a price of Rs9,000 per quintal for cotton is expected," he said.

Times of India
1 June, 2022

Cotton in Media

लोकमत

आदिवासी शेतकऱ्यांना धान बियाण्यांचे वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

पवनारा : केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूरच्या चमूद्वारे भंडारा जिल्ह्यातील खापा, विटपूर, लेंडेझर, सीतेकसा या आदिवासीबहुल गावातील धान उत्पादक शेतकऱ्यांना पीकेव्ही तिलक आणि पीकेव्ही किसान या उन्नत धान बियाणे वाणांचे वाटप केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूरचे आदिवासी उपयोजना नोडल अधिकारी व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. चिन्नाबाबू नाईक यांच्या हस्ते करण्यात आले.

शेतकऱ्यांना बियाणे वाटप करण्यात आले तो क्षण.

यासह संस्थेच्यावतीने खापा येथे 'शेतकरी प्रशिक्षण व निविष्ठा वितरण' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये आदिवासी उपयोजना नोडल अधिकारी व (कृषी कीटकशास्त्र) वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. चिन्नाबाबू नाईक यांनी आदिवासी उपयोजनेअंतर्गत संस्थेतर्फे आदिवासी शेतकऱ्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व कार्याची माहिती उपस्थित शेतकऱ्यांना दिली. तर धान व कापूस पिकावरील किडींचे एकात्मिक व्यवस्थापन पद्धतीवर माहिती देऊन जिल्ह्यातील धान व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना पिकावर येणारे विविध रोग व त्यांचे एकात्मिक व्यवस्थापन प्रभावीपणे कसे करावे यावर विस्तृत मार्गदर्शन वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दीपक नगराळे यांनी केले.

शेतकरी प्रशिक्षण, निविष्ठा व धान बियाणे वितरण कार्यक्रम केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे संचालक डॉ. वाय. जी. प्रसाद, आदिवासी उपयोजना नोडल अधिकारी व (कृषी कीटकशास्त्र) वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. चिन्नाबाबू नाईक यांच्या मार्गदर्शनात आदिवासी शेतकऱ्यांसाठी राबविण्यात आले. कार्यक्रमासाठी हरेश मरस्कोल्हे यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे संचालक डॉ. वाय. जी. प्रसाद, आदिवासी उपयोजना नोडल अधिकारी व (कृषी कीटकशास्त्र) वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. चिन्नाबाबू नाईक, वरिष्ठ शास्त्रज्ञ (वनस्पती रोगशास्त्र) डॉ. दीपक नगराळे, तांत्रिक अधिकारी सुजित कुंभरे व आदिवासी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार तांत्रिक अधिकारी सुजित कुंभरे यांनी मानले.

Hello Bhandara
Page No. 3 Jun 22, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

महाबीजचे हे सुधारित बियाणे वाढविणार शेतकऱ्यांचे उत्पादन

लोकमत न्यूज नेटवर्क

गडचिरोली : केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूर तसेच कृषी विज्ञान केंद्र गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा व सुधारित धान प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २७ जून रोजी कृषी विज्ञान केंद्रात करण्यात आले होते. याप्रसंगी उपस्थित शेतकऱ्यांना खरीप हंगाम लागवडीकरिता पीकेव्ही तिलक व पीकेव्ही किसान या सुधारित धान बियाणे प्रात्याक्षिकाकरिता देण्यात आले.

शेतकऱ्यांना वाटप केलेल्या सुधारीत बियाण्यांसह लाभार्थी शेतकरी आणि कृषी विज्ञान केंद्र व पोलीस विभागाचे अधिकारी.

सदर कार्यक्रम केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे संचालक डॉ. वाय. जी. प्रसाद, वरिष्ठ शात्रज्ञ डॉ. चिन्ना बाबू नाईक यांच्या प्रमुख मार्गदर्शनात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संदीप कऱ्हाळे, डॉ. दीपक नगराळे, डॉ. एन. चंद्रशेखर, नरेश बुद्धेवार, ज्ञानेश्वर ताथोड आदी उपस्थित होते.

डॉ. संदीप कऱ्हाळे यांनी जिल्ह्यातील धान व कापूस लागवड याची माहिती देऊन खत व्यवस्थापनात युरिया ब्रिकेटचे महत्व उपस्थितांना पटवून दिले. युरिया ६० टक्के आणि ४० टक्के डीएपी या मिश्रणातून ब्रिकेटिंग मशीनच्या साहाय्याने २.७ ग्राम वजनाची गोळी (ब्रिकेट) करण्यात येते. कार्यक्रमाचे संचालन ज्ञानेश्वर ताथोड व हरेश मरस्कोल्हे यांनी केले. कार्यक्रमात जिल्ह्यातील जवळपास ६० आदिवासी शेतकरी बांधवांना धान प्रात्यक्षिक देण्यात आले.

लागवड तंत्रज्ञान

कृषी विज्ञान केंद्रातील विषय विशेषज्ञांनी शेतकऱ्यांना धान पिकाचे उन्नत लागवड तंत्रज्ञान, पेरणी व्यवस्थापन, योग्य जलसिंचन व्यवस्थापन याद्वारे उत्पादकता आणि उत्पादन वाढ कशी होईल यावर विस्तृत मार्गदर्शन केले. संशोधन संस्थेच्या शास्त्रज्ञांनी धानासोबत कापसावरील रोग आणि किडींचे व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले.

Hello Gadchiroli
Page No. 1 Jun 29, 2022
Powered by: erelego.com

देशोन्नती

आदिवासी शेतकऱ्यांना धान बियाण्यांचे वाटप व शेतकरी प्रशिक्षण

देशोन्नती वृत्तसंकलन...

■ केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूरचा उपक्रम

लोहारा (गायमुख) ■ केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूरच्या चमूद्वारे भंडारा जिल्ह्यातील खापा, विटपूर, लेंडेझर, सीतेकसा या आदिवासीबहुल गावातील धान उत्पादक शेतकऱ्यांना पीकेव्ही तिलक आणि पीकेव्ही किसान या उन्नत धानबियाणे वाणांचे वाटप केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूरचे आदिवासी उपाययोजना नोडल अधिकारी व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.चिन्ना नाईक यांच्या हस्ते करण्यात आले.

यासह संस्थेच्या वतीने खापा येथे 'शेतकरी प्रशिक्षण व निविष्ठा वितरण' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये आदिवासी उपाययोजना नोडल अधिकारी डॉ.चिन्ना नाईक यांनी आदिवासी उपयोजनेअंतर्गत संस्थेतर्फे आदिवासी शेतकऱ्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व कार्याची माहिती उपस्थित शेतकऱ्यांना दिली. तर धान व कापूस पिकावरील किडींचे एकात्मिक व्यवस्थापन पद्धतीवर माहिती देवुन जिल्ह्यातील धान व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना पिकावर येणारे विविध रोग व त्यांचे एकात्मिक व्यवस्थापन प्रभावीपणे कसे करावे यावर विस्तृत मार्गदर्शन वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.दिपक नगराळे यांनी केले.

शेतकरी प्रशिक्षण, निविष्ठा व धान बियाणे वितरण कार्यक्रम केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे संचालक डॉ.वाय.जी.प्रसाद, आदिवासी उपयोजना नोडल अधिकारी डॉ.चिन्ना नाईक यांच्या मार्गदर्शनात आदिवासी शेतकऱ्यांसाठी राबविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हरेश मरस्कोल्हे यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे संचालक डॉ.वाय.जी.प्रसाद, आदिवासी उपयोजना नोडल अधिकारी डॉ.चिन्ना नाईक, डॉ.दिपक नगराळे, सुजित कुंभरे व परिसरातील शेकडो आदिवासी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितीताचे आभार तांत्रिक अधिकारी सुजित कुंभरे यांनी मानले.

Deshonnati Edition
Jun 20, 2022 Page No. 6
Powered by : eReleGo.com

शेतकऱ्यांना कीर्तनातून लावली कृषी ज्ञानाची गोडी

दोन शास्त्रज्ञांनी घातली कीर्तनाची 'कृषी'शी सांगड

संतोष मुंढे : ॲग्रोवन वृत्तसेवा

औरंगाबाद : 'नाचू कीर्तनाचे रंगी, कृषी ज्ञानदीप लावू जगी' या हेतूने केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूरचे कीटकशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब फंड व वनस्पतिरोग्यशास्त्रज्ञ डॉ. शैलेश गावंडे या शास्त्रज्ञ एकत्र आले. कीर्तनाची सांगड कृषी शास्त्राशी घालत त्यांनी कृषी ज्ञानजागराचा वसा शेतकऱ्यांना देण्याचे काम सुरू केले आहे. 'कपाशीवरील कीड रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन' या विषयावरील त्यांच्या कृषी कीर्तनमालेचे पाचवे पुष्प त्यांनी औरंगाबाद येथे नुकतेच गुंफले.

कृषी ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानाला अध्यात्माची जोड दिली तर कृषी ज्ञान विस्ताराचे कार्य किती सहजगतीने व परिणामकारकरीत्या होते, पान ४ वर »

> शेतीच आधुनिक तंत्रज्ञान अवघड शास्त्रोक्त भाषेत न सांगता संतपरंपरेने मनावर रुजविलेल्या अभंगांच्या सोप्या व समजणाऱ्या चालीवरून ओवीबद्ध केले तर शेतकऱ्यांना समजण्यास मदत होईल. म्हणूनच एक कविता रचून त्या माध्यमातून कृषी कीर्तनाचा संगम जुळवून आणला.
> – डॉ. बाबासाहेब फंड, कीटकशासत्रज्ञ, केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर

शेतकऱ्यांना कीर्तनातून लावली कृषी ज्ञानाची गोडी

» पान १ वरून

याची प्रचिती या दोन्ही शास्त्रज्ञांच्या कृषिज्ञान विस्ताराच्या नावीन्यपूर्ण प्रयत्नांमुळे येते आहे. केंद्रीय कापूस संशोधन संस्थेद्वारे अनुसूचित जाती उपाययोजना अंतर्गत कृषी कीर्तनातून कपाशी पिकावरील कीड रोगांच्या एकात्मिक व्यवस्थापनाचे धडे शेतकऱ्यांच्या मनावर बिंबविले.

औरंगाबाद : कृषी विज्ञान केंद्र - १ येथील सभागृहात 'कृषी कीर्तन' करताना केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे शास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब फंड, डॉ. शैलेश गावंडे. या वेळी त्यांना साथसंगत करणारे अन्य सहकारी.

'न समृद्धी कृषिविना' या शब्दांपासून सुरू होणारे त्यांचे कृषी कीर्तन 'गुलाबी बोंड अळी नियंत्रणाचा सोपा मंत्र, अवलंब करा एकात्मिक व्यवस्थापनाचे तंत्र' 'करण्या किडीचे प्रभावी नियंत्रण, सीआयसीआरने आणले नव तंत्रज्ञान' अशा कृषी ओव्यातून मार्गक्रमण करते. कोणत्या टप्प्यावर कोणती औषधे किती प्रमाणात वापरावीत, याची कारणमीमांसा ते 'ओलांडता किडीने आर्थिक नुकसान पातळी, शिफारस केलेलीच फवारणी घ्या वेळोवेळी' या ओवीतून करतात. 'एकात्मिक कीड व्यवस्थापनाची किमया भारी, कीड आणि रोगांचे नियंत्रण करी' असे सांगत त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कीर्तनाच्या माध्यमातूनच शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे.

> **अध्यात्माची जोड देऊन कृषिशास्त्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. 'बीजे अंकुरे अंकुरे ओल्या मातीच्या कुशीत, रखमा माझी पेरणी माझा पांडुरंग नांगर धरी,' अशा ओवीतून कृषिज्ञान शेतकऱ्यांच्या हृदयाचा ठाव घेणारे ठरेल, असा प्रयत्न आहे.**
> **- डॉ. शैलेश गावंडे,**
> वनस्पतिरोगशास्त्रज्ञ, केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर

ॲग्रोवन

सुधारित वाणाच्या वापरातून उत्पादकता वाढविणे गरजेचे

डॉ. शैलेश गावंडे : प्रशिक्षण आणि निविष्ठा वितरण कार्यक्रम

ॲग्रोवन वृत्तसेवा

औरंगाबाद : कृषिशास्त्र आणि सुधारित वाणाच्या वापरातून शेतकऱ्याने उत्पादकता व पर्यायाने उत्पन्न वाढवून आपला आर्थिक स्तर उंचवावा, असा सल्ला केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूरचे वनस्पती रोगशास्त्र डॉ. शैलेश गावंडे यांनी दिला.

औरंगाबाद : वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी कृषी विज्ञान केंद्र यांच्यातर्फे शुक्रवारी (ता. १७) शेतकऱ्यांना निविष्ठा वितरण करण्यात आले.

भारतीय कृषी अनुसंधान परिषद, केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूर आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी कृषी विज्ञान केंद्र-१ औरंगाबाद यांच्या माध्यमातून अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत प्रथम रेषीय प्रात्यक्षिक २०२२-२३ मधील शुक्रवारी(ता. १७) आयोजित प्रशिक्षण आणि निविष्ठा वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. कृषी विज्ञान केंद्र औरंगाबादच्या सभागृहात शुक्रवारी आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. टी. जाधव तर प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे कीटकशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब फंड, कृषी विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. किशोर झाडे आदींची उपस्थिती होती.

या प्रशिक्षण आणि निविष्ठा वितरण कार्यक्रमात अनुसूचित जातीतील शेतकऱ्यांना इंदूर येथील सोयाबीन संशोधन केंद्राने संशोधित केलेल्या नवीन सोयाबीन एनआरसी-१३० या सोयाबीन वाणाचे बियाणे प्रात्यक्षिकसाठी देण्यात आले. जिल्ह्यातील ६४ शेतकऱ्यांना ६४ एकरसाठी हे बियाणे पुरविण्यात येणार आहे. प्रातिनिधिक स्वरूपात बियाणे वाटप करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. झाडे यांनी केले.

Aurangabad, Main
19/06/2022 Page No. 5

तरुण भारत

Apla Nagpur | 2022-06-22 | Page- 2
epaper.tarunbharat.net

शेती नफ्यात आणण्यासाठी जोडधंदा कराच

डॉ. सुनील रोकडे यांचे आवाहन

◆ नागपूर, २१ जून

आज महागाई वाढली आहे. या स्थितीत केवळ एकाने पैसा कमावून भागत नाही. अशावेळी पती आणि पत्नी दोघेही नोकरी करून संसाराला हातभार लावतात. तिथे नक्कीच त्यांची आर्थिक भरभराट होते. मग तोच फॉर्म्युला शेतकऱ्यांनीही शेती करताना अमलात आणावा. त्यांनी शेती नफ्यात आणण्यासाठी सोबत जोडधंदा करावाच, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सुनील रोकडे यांनी केले.

बियाणे वितरण कार्यक्रमात सहभागी डॉ. वाय. जी. प्रसाद, डॉ. सुनील रोकडे, डॉ. शिवाजी सरोदे आणि शेतकरी लाभार्थी

भारतीय कृषी अनुसंधान परिषद, केंद्रीय कापूस संशोधन संस्था व कृषी विज्ञान केंद्र येथे अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत प्रशिक्षण व निविष्ठा वितरण कार्यक्रम पार पडला. यावेळी डॉ. सुनील रोकडे बोलत होते. कार्यक्रमात संचालक डॉ. वाय.जी.प्रसाद, डॉ. शिवाजी सरोदे, डॉ. नंदिनी गोकटे, डॉ. जयंत मेश्राम, डॉ. सुभाष पाटील, डॉ. बाबासाहेब फंड, डॉ. उल्हास गव्हाकटे, डॉ. शैलेश गावंडे, डॉ. हिरेमनी उपस्थित होते.

शेती तोट्यात आहे, असेच ओरड शेतकरी करतात. पण शेती नफ्यात यावी याकरिता विशेष प्रयत्न करण्याचे टाळतात. आता सर्वच तज्ज्ञांनी शेतीसोबत जोडधंदा करण्यावर भर दिला आहे. तो जोडधंदा शेतीपूरक असेल तर नक्कीच त्याचे लाभ अधिक मिळतात. मग आपण मार्ग मिळाल्यावर मागे का म्हणून राहायचे असाही सवाल डॉ. सुनील रोकडे यांनी उपस्थित केला.

योजना समजून घ्या : डॉ. प्रसाद

भारत सरकारने अनुसूचित जातीसाठी अनेक चांगल्या योजना आणल्या आहेत. आम्ही तर त्या योजना राबविणाऱ्या संस्थेत कार्यरत आहोत. तेव्हा शेतकऱ्यांनी अशा योजना समजून त्याचे लाभ घेत आयुष्यात प्रगती करावी असे आवाहन केंद्रीय कापूस संशोधन केंद्राचे संचालक डॉ. वाय. जी. प्रसाद यांनी केले. आज आपल्याला मिळालेले बियाणे पूर्णतः तपासून दिले आहेत. याची उगवण क्षमता चांगली आहे. तेव्हा याची लागवड करून आपली आर्थिक उन्नती साधा असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमात डॉ. शिवाजी सरोदे यांनी सोयाबीन व तूर हे बियाणे नेमके कसे हाताळायचे याची सहज सुलभ पद्धतीने माहिती दिली. बियाणांची उगवणक्षमता कायम ठेवत आपल्याला त्यांना हाताळायचे असते. ते नाजूक असतात. अशावेळी शेतकऱ्यांनी त्यांना तळ हाताच्या फोडाप्रमाणे जपत त्यांची लागवड करावी. जेणेकरून त्यांना त्याचे भविष्यात चांगले लाभ होतील असेही ते म्हणाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अक्षय कांबळे, विजय गायकवाड, श्रीधर एलुका, अश्विन मेश्राम, जयश्री खोब्रागडे यांनी परिश्रम घेतले. ◄(तभा वृत्तसेवा)

Powered by iDocuments



Produced and published by
Dr. Y. G. Prasad, Director, ICAR-CICR, Nagpur

Chief Editor:
Dr. Y. G. Prasad

Senior Editor:
Dr. Annie Sheeba

Associate Editor, Cover page & Layout Design:
Dr. M. Sabesh

Editors: Dr. V. Chinna Babu Naik, Dr. Pooja Verma, Dr. K. Baghyalakshmi, Dr. Debashis Paul

Publication Note: Cotton Innovate is an Open Access monthly newsletter of ICAR-CICR, Nagpur available online at http://www.cicr.org.in/cotton_innovate.html

Published by

Director ICAR-Central Institute for Cotton Research Post Bag No. 2, Shankar Nagar PO, Nagpur 440010, India
Phone: 07103-275536; Fax: 07103-275529
Email: cicrnagpur@gmail.com, director.cicr@icar.gov.in

Citation: Cotton Innovate 2022, ICAR-Central Institute for Cotton Research, Nagpur, India, Volume: 06 (02), pp-16, available at http://www.cicr.org.in/cotton_innovate.htm

To subscribe for receiving an electronic copy of this newsletter, please write a request mail to cicrinnovate@gmail.com

ICAR-CICR
ICAR - Central Institute for Cotton Research
(An ISO 9000 : 2015 Certified Organisation)